# बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक

२०१९-२०२०

क्र.प्रले/एफडीटी/एफआय/१३ दि.२१.०८.२०१९

विषय - बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी सेवास्तर मानकांच्या (Service Level Benchmarking) नियंत्रणाकरिता व्यवस्थापन माहिती प्रणालीची रचना व अंमलबजावणी करण्यासाठी संगणक आधारसामग्री विकसित करण्यात आली असून सदर प्रणालीत आवश्यक ती माहिती पुरवण्याकरिता विविध संबंधित खात्यांची/ विभागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत व नियमित डेटा एंट्री करण्याबाबत

---

तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनांना अनुदान (General Performance Grant) प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासनाने विहित केलेल्या मानकांप्रमाणे (SLB) मुलभूत नागरी सेवा पुरविणे अत्यावश्यक आहे. सदर SLB ची माहिती वर्षा अखेर नागरी स्वराज्य संस्थेनिहाय शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तदअनुषंगाने महानगरपालिकेच्यावतीने बृहन्मुंबई महागरपालिकेच्या मुलभूत सेवांबाबतचा अभ्यास करून मे.क्रिसील यांनी कन्सेप्ट प्लान तयार करून सदर कन्सेप्ट प्लान वर आधारित मे.केपीएमजी यांनी प्रणाली (Software) विकसित केली असून दि.३१.०८.२०१७ रोजी सदर प्रणाली Go-live करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महागरपालिकेच्या विविध खात्यांकडून/विभाग कार्यालयांकडून सदर प्रणालीमध्ये आवश्यक ती सर्व माहिती अद्ययावत करणे अपेक्षित आहे.

सदर प्रणाली विकसित करीत असताना जल अभियंता, प्रमुख अभियंता (मल:निसारण प्रचालन), प्रमुख अभियंता (घ.क.व्य.), प्रमुख अभियंता (प.ज.वा.) खाते तसेच त्यांचे उपविभाग आणि २४ विभाग कार्यालयांतील संबंधित कर्मचाऱ्यांसोबत, सदर प्रणालीबाबत User Acceptance Test (UAT) घेण्यात आली होती. सध्या अस्तित्वात असलेल्या प्रणालींमधुन संबंधित खात्याची माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. परंतु काही खाते/विभागांमार्फत अद्यापही माहिती अद्ययावत होत नसल्याचे निदर्शनास आले असून परिणामी प्रणालीतील काही मानांकनांचे अहवाल निरंक/चुकीचे येत आहेत. त्याचप्रमाणे वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या आढावा बैठकांमध्ये संबंधित कर्मचारी तसेच विभाग कार्यालयातील/उपविभागातील कर्मचाऱ्यांना सूचना देऊन सुद्धा डेटा एंट्री होत नसल्याचे तसेच जेथे होते तेथे ती योग्यप्रकारे /पुरेश्याप्रमाणात होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच संबंधीत खात्यांशी चर्चा करताना असे निदर्शनास आले की, एका मानांकनाच्या (Indicator) परिगणनासाठी आवश्यक असलेली माहिती एकापेक्षा अधिक खात्यांमार्फत / मार्गांमार्फत मिळणे आवश्यक असून सदर माहिती सर्व्हिस लेव्हल बेंचमार्किंग प्रणालीमध्ये अद्ययावत झाल्यानंतरच मानांकनाबाबतचा अचूक अहवाल मिळणे शक्य होणार आहे त्यामुळे संबंधीत सर्व खाते /उपविभाग / २४ विभाग कार्यालयातील संबंधीत कर्मचाऱ्यांनी सर्व्हिस लेव्हल बेंचमार्किंग प्रोजेक्ट करिता आवश्यक ती माहिती युध्दपातळीवर अद्ययावत करणे गरजेचे आहे. यापुढेही नियमित भरावयाची माहिती (Data Entry) सात दिवसांमध्ये SLB MIS प्रणालीमध्ये वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक असून सदर माहिती अचूक असल्याची खातरजमा करण्यात यावी, जेणेकरून सदर प्रणालीतल्या सर्व मानांकनांबाबतचे योग्य अहवाल तातडीने उपलब्ध होऊन भविष्यात गरज भासल्यास आवश्यक ते अनुदान शासनाकडून प्राप्त करण्यास मदत होईल."

सर्व सहाय्यक आयुक्त, खाते प्रमुख, अधिष्ठाता, उप आयुक्त यांनी याची दखल घ्यावी आणि त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन, प्रतिमाहा आढावा बैठक घेऊन त्याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदर बाबतीत संबंधित कर्मचाऱ्यांकडून दिरंगाई झाल्यास त्याबाबतची नोंद गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (श्री.रामदास आव्हाड) | (श्री.प्रदिप भा. पडवळ) | (श्री.प्रविण दराडे) |
| प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) | प्रमुख लेखापाल (वित्त) प्र. | मान.अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) |

---

परिपत्रक

२०१९-२०

क्रमांक- प्रले/एफडीटी/एफआय/१३ दिनांक २१/०८/२०१९

---------------------------------------- यांना प्रत (--------------- जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

जयेश किशोर बारीया
प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरीता